## न्यूज ब्रिफ

### सोन्याच्या लुटीप्रकरणी दोन आरोपी जेरबंद !

जळगाव : प्रतिनिधी

सोन्याच्या लुटीप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे मोठी कारवाई करत दोन आरोपींना अटक केली. या कारवाईत २० ग्रॅम सोन्याचा ऐवज जप्त करण्यात आला असून, आरोपींना पुढील तपासासाठी रामानंद नगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. रामानंद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १२१/२०२५ नुसार बीएनएस कलम ३०५(अ), ३३१(३)(४) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे तातडीने तपास सुरू करण्यात आला. संशयित आरोपींना ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. आरोपींकडून २० ग्रॅम सोने हस्तगत करण्यात आले. अबरार हमीद खाटीक (रा. उमर कॉलनी, जळगाव), समीर शेख सलीम (रा. हुडको, पिंप्राळा, जळगाव) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

हि कारवाई पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, डीवायएसपी संदीप गावित, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश वाघमारे, सपोनि राजेश मेढे, सपोनि रवी नरवाडे, सपोनि अतुल वंजारी, सागर पाटील आदींच्या पथकाने हि कारवाई केली.

### जिल्हाधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांना शुभेच्छा

# आदिवासी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांचा इस्रो दौरा

जळगाव : प्रतिनिधी



एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल अंतर्गत जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना इस्रो (अहमदाबाद) सहलीसाठी संधी मिळाली आहे. या विद्यार्थ्यांसोबत शिक्षकांचा समावेश असून, त्यांना आज जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी शुभेच्छा दिल्या.

जिल्हाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना, या सहलीतील अनुभव लेखी स्वरूपात कळवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनातील प्रत्येक वयोगटातून प्रथम तीन क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांची या सहलीसाठी निवड करण्यात आली. एकूण 18 विद्यार्थी आणि 6 शिक्षक-कर्मचारी या शैक्षणिक सहलीसाठी रवाना झाले आहेत.

विद्यार्थ्यांचा प्रवास रेल्वेने होणार असून, परतीचा प्रवास विमानाने करण्याची संधी त्यांना मिळणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

इस्रो व विज्ञान केंद्र भेट या सहलीत विद्यार्थ्यांना अहमदाबाद येथील विक्रम साराभाई स्पेस रिसर्च सेंटरला भेट देण्याची संधी मिळणार आहे. तसेच, ते सायन्स सिटीमधील एक्वेरियम, रोबोटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि इतर वैज्ञानिक विभागांना भेट देऊन प्रत्यक्ष अनुभव घेणार आहेत.

विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी "विद्यार्थ्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात अधिकाधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, त्यांची जिज्ञासा वाढावी आणि भविष्यात ते स्वतःला सिद्ध करावेत, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. अशा शैक्षणिक सहलींमुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकातील ज्ञान नव्हे, तर प्रत्यक्ष अनुभवही मिळतो. भविष्यात देखील अशा प्रकारच्या उपक्रमांना चालना देण्यात येईल," असा विश्वास प्रकल्प अधिकारी अरुण पवार यांनी व्यक्त केला.

**सहलीचे नियोजन आणि योगदान**

या सहलीचे नियोजन शिक्षण विभागाचे सहायक प्रकल्प अधिकारी पवन पाटील, आर. एम. लावणे, संदीप पाटील, विश्वास गायकवाड आणि एल. एम. पाटील यांनी परिश्रमपूर्वक केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना ही अनमोल संधी मिळाली आहे.

# दुचाकीच्या अपघातात न्यायालयातील वरिष्ठ लिपीकाचा दुर्दैवी मृत्यू !

जळगाव : प्रतिनिधी



बोदवड येथून जळगावकडे येणाऱ्या आणि जळगावकडून भुसावळकडे विरुद्ध बाजूने भरधाव वेगाने दुचाकीने जोरदार धडक दिली. या अपघातात बोदवड न्यायालयात वरिष्ठ लिपीक म्हणून नियुक्तीस असलेल्य योगेश बळीराम पाटील (वय ५१, रा. चैतन्य नगर) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना मंगळवार दि. १ रोजी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास नशिराबादजवळील हॉटेल सावनजवळील सर्विस रोडवर घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील चैतन्य नगरात योगेश पाटील हे बोदवड न्यायालयात वरिष्ठ लिपीक म्हणून नोकरीस होते. तर त्यांची पत्नी या लघुपाटबंधारे येथे नोकरीस आहेत. ड्युटी आटोपल्यानंतर योगेश पाटील हे दुचाकीने जळगावकडे येण्यास निघाले. महामार्गावरील सर्विस रोडवरुन येत असतांना जळगावकडून भुसावळकडे सर्विस रोडवर विरुद्ध दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या दुचाकीस्वारांनी त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात योगेश पाटील यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाले होते. तर धडक (पान २ वर)

# अखेर 'त्या' मृतदेहाची ओळख पटली !

चाळीसगाव : प्रतिनिधी

शहरातील भडगाव रोडवरील वाणी मंगल कार्यालयासमोर डी. के. टेलर दुकानाच्या बाजूला असलेल्या छताला एका ४५ वर्षीय अनोळखी व्यक्तिने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना २९ रोजी सकाळी ८.२५ वाजेपूर्वी उघडकीस आली होती. त्या प्रौढाची ओळख पटवण्यात पोलिसांना यश आले आहे.

या प्रकरणी चाळीसगाव शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आल्यानंतर पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनात हवालदार प्रशांत पाटील, पो.कॉ. अमोल पाटील, हरिचंद्र पाटील यांनी तपासाची चक्रे फिरवली. तर तंत्रज्ञानाच्या आधारे, मोबाईल लोकेशन व रेल्वे स्टेशनचे फुटेज प्राप्त करून मयत प्रौढ हा ज्या रेल्वे स्टेशनवरून बसला होता, त्या रेल्वे स्टेशनचे फुटेज प्राप्त करून त्याचा शोध घेत मृतदेहाची ओळख पटवण्यात आली. (पान २ वर)

# जुने वाहन स्वेच्छेने मोडीत काढल्यास नव्यासाठी १५ टक्के कर सवलत

जळगाव : प्रतिनिधी

स्वेच्छेने वाहन मोडीत (स्क्रॅप) काढणाऱ्या वाहनधारकांना पुन्हा त्याचप्रकारचे नवीन वाहन खरेदी करताना १५ टक्के कर सवलत देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

नोंदणीकृत वाहन निष्कासन केंद्रावर (आरव्हीएसएफ) परिवहन प्रकारातील वाहनांना नोंदणीपासून ८ वर्षांच्या आत वाहन स्वेच्छेने मोडीत काढल्यास तसेच परिवहनेतर प्रकारातील वाहनांना नोंदणी पासून १५ वर्षांच्या आत स्वेच्छेने वाहन मोडीत काढल्यास १० टक्क्यांची कर सवलत दिली जात होती.

यापुढे एकरकमी कर लागू असणाऱ्या परिवहन (ट्रान्सपोर्ट) तसेच परिवहनेतर वाहनांना कराच्या १५ टक्के सवलत दिली जाणार आहे. तर ज्या वाहनांना वार्षिक कर लागू आहे अशा परिवहन प्रकारातील वाहनाच्या नोंदणी दिनांकापासून पुढील ८ वर्षांपर्यंत तर परिवहनेतर प्रकारातील वाहनांसाठी पुढील १५ वर्षांपर्यंत वार्षिक करात १५ टक्के सवलत देण्यात येणार आहे. नोंदणीकृत केंद्रावर (आरव्हीएसएफ) वाहन मोडीत (स्क्रॅप केल्यानंतर ) काढल्यानंतर वाहन धारकास मिळालेले ठेव (पान २ वर)

# शेतकऱ्यांच्या तक्रारीची दखल, शेतरस्ता खुला

जळगाव : प्रतिनिधी


नकाशाप्रमाणे अतिक्रमित व बंद झालेले गाडी रस्ते / पाणंद / पांधण / शेतरस्ते /शिवाररस्ते / शेतावर जाण्याचे मार्ग मोकळे करावे, वहिवाटीचे रस्ते मोकळे करुन तयार करण्याच्या सुचना जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिल्या आहेत. त्याअंतर्गत जळगाव जिल्ह्यात अतिक्रमित शेत पाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी शंभर दिवसांची मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमे अंतर्गत अनेक शेत शिवारातील रस्ते मोकळे करण्यात आले आहेत. अशातच चोपडा तालुक्यातील चिंचाणे गावातील शेतकरी प्रज्वल पाटील यांच्या शिवारातील शेतरस्ता प्रशासनाच्या मदतीने मोकळा करण्यास आला आहे.

शेतरस्ता मोकळा करण्यासंदर्भात पाटील यांनी मागील जनसंवाद कार्यक्रमात तक्रार दिली होती. त्यानंतर (पान २ वर)

# शेतकऱ्याचे नुकसान : हरभऱ्याच्या गंजीला आग !

जळगाव : प्रतिनिधी

पाचोरा : प्रतिनिधी तालुक्यातील वरखेडी बुद्रुक येथील अल्पभूधारक शेतकरी सतीश त्र्यंबक पाटील यांच्या मालकीचे गट नंबर १०२ मधील तीन एकर क्षेत्रात हरभरा लावलेला होता. परिपक्व झाल्यानंतर शेतात कापून ठेवलेल्या हरभऱ्याच्या गंजीला सोमवारी रात्री आठ ते साडेआठ वाजेच्या सुमारास अचानकपणे आग लागून संपूर्ण हरभऱ्याचे पीक जळून खाक झाले. शेतकऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, हरभऱ्याच्या गंजीवरून वीज वाहिन्या गेल्या असून सायंकाळी वादळ आल्याने या वीज वाहिन्यांचे घर्षण होऊन हरभऱ्याच्या गंजीवर ठिणगी पडली असावी व गंजीने पेट घेतला असावा.



वरखेडी-पाचोरा रस्त्यावर असलेल्या पेट्रोलपंपाच्या मागील बाजूस पाटील यांची गटनंबर १०२ मध्ये शेतजमीन असून या शेतात त्यांनी उन्हाळी हरभऱ्याचे पीक घेतले होते. हे ३१ मार्च रोजी हरभरा पिकाची कापणी करून शेतातच एका ठिकाणी ढीग (गंजी) घालून ठेवला होता. ते मंगळवारी मळणी यंत्राच्या साहाय्याने हरभरा पिकाची काढणी करणार होते. त्या आधीच ही आग लागली. दुर्दैव असे की, (पान २ वर)

# अज्ञात वाहनाच्या धडकेत माजी सरपंचाचा जागीच मृत्यू !

जळगाव : प्रतिनिधी



चाळीसगाव तालुक्यातील धुळे महामार्गावर असलेल्या भोरस फाट्याजवळ अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिली. या अपघातात लांबे वडगाव येथील माजी सरपंच तथा विद्यमान सदस्य प्रकाश निळकंठ पाटील (वय ४५) हे गंभीर जखमी झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना मंगळवार दि. १ वाजेच्या सुमारास घडली.

सविस्तर वृत्त असे कि, चाळीसगाव तालुक्यातील लांबे वडगाव येथील प्रकाश पाटील हे मंगळवारी दुपारच्या सुमारास दुचाकीने चाळीसगावकडून गावाकडे जात होते. यावेळी भोरस फाट्याजवळील लॉन्स समोर भरधाव वेगाने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने धडक दिली. या अपघातात प्रकाश पाटील हे गंभीर जखमी झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत प्रकाश पाल यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. याठिकाणी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांची तपासणी करीत मयत घोषीत केले. याप्रकरणी चाळीसगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तपास पोहेकॉ ओंकार सुतार करीत आहेत.


# राज्यात "जिवंत सातबारा" मोहीम सुरू

### वारसांच्या नोंदी अद्ययावत करून घेण्याचे आवाहन

जळगाव : प्रतिनिधी

महसूल विभाग 100 दिवस कृती कार्यक्रम आराखडा अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने राज्यात "जिवंत सातबारा" मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेअंतर्गत, सातबारावरील मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदी अद्ययावत केल्या जाणार आहेत.

या मोहिमेचा मुख्य उद्देश मयत खातेदारांच्या वारसांना शेतजमिनी संबंधित कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांमध्ये वारसांची नोंद वेळेत व्हावी हा आहे. अनेकदा वारसांची नोंद नसल्यामुळे अडचणी येतात, त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्ह्यातील ज्या नागरिकांच्या सातबाऱ्यावर अशा नोंदी राहिल्या असतील त्यांनी तलाठ्या कडे जाऊन आपल्या नोंदी करून घ्याव्यात असे आवाहन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केले आहे.



मोहिमेचा कार्यक्रम: १ एप्रिल, २०२५ ते ५ एप्रिल, २०२५: तलाठी गावांमध्ये चावडी वाचन करून मयत खातेदारांची यादी तयार करतील.

६ एप्रिल, २०२५ ते २० एप्रिल, २०२५: वारसांनी आवश्यक कागदपत्रे तलाठ्यांकडे जमा करायची आहेत. तलाठी पडताळणी करून वारस ठराव मंजूर करतील.

२१ एप्रिल, २०२५ ते १० मे, २०२५: तलाठी वारस फेरफार तयार करतील आणि मंडळ अधिकारी ७/१२ दुरुस्त करतील.

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने मयत खातेदारांच्या याद्या तलाठी यांचेमार्फत तयार करण्यात येत आहेत. संबंधित मयत खातेदार यांचे वारसांनी मृत्यू प्रमाणपत्र व वारसांची माहिती संबंधित तलाठी यांचेकडे द्यावी.

या कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी तहसीलदारांना समन्वय अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांना नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. विभागीय आयुक्त विभागीय स्तरावर देखरेख ठेवणार आहेत. सातबारावरील मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदीची प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व वारस नोंदी घेऊन ७/१२ "जिवंत" म्हणजेच अद्ययावत करणेसाठी वर नमूद केल्याप्रमाणे विहित कालबध्द कार्यक्रम राबवावा व "जिवंत ७/१२" मोहिम यशस्वी होईल याची दक्षता घ्यावी, तसेच गावकऱ्यांनी आपआपल्या गावातील तलाठ्यांना भेटून "जिवंत ७/१२" मोहिमेचा उपयोग करून घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केले आहे